पुणे जिल्हा शिक्षण मंडळ

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,पौड रोड,पुणे-३८

## अँटीहरेसमेंट अहवाल

## शैक्षणिक वर्ष:-2023-24

**06/09/2023: "महिला सक्षमीकरण: महिलांची आर्थिक व सामाजिक सुरक्षितता"**

मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात वूमन सेल मार्फत प्राचार्य डॉ गंगाधर सातव त्यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 6 सप्टेंबर 2023 रोजी 'पॅन इंडिया' संस्थेच्या समन्वयक अलका गुंजाळ यांचे "महिला सक्षमीकरण" या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले.

या व्याख्यानामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींना अलका गुंजाळ यांनी केंद्र आणि राज्य शासनामार्फत महिलांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेसाठी केलेले कायदे व त्यामधील महत्त्वाच्या तरतुदी विद्यार्थिनींना समजावून सांगितल्या तसेच शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती माहिती देऊन त्याचा फायदा कसा करून घ्यायचा तसेच पाठपुरावा कसा करायचा याबाबत मार्गदर्शन केले त्याचबरोबर पुणे महानगरपालिकेमार्फत महिलांसाठी राबविले जाणारे उपक्रम व त्याचा महिलांना होणारा फायदा याबाबत सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजन अँटी हरेसमेंट आणि वुमन सेल विभागाच्या समन्वय डॉ. रूपाली शेंडकर आणि डॉ. स्वाती शिंदे यांनी केले महाविद्यालयातील विद्यार्थिनी महिला प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमास आपला सहभाग नोंदविला.

**पॅन इंडिया' संस्थेच्या समन्वयक अलका गुंजाळ मार्गदर्शन करताना**











03/10/

2023 ‘विद्यार्थी सुरक्षितता जाणीव जागृती’:

मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दिनांक 3 ऑक्टोबर 2023 रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील अँटीहरेसमेंट विभागाच्या वतीने महाविद्यालयात राबवल्या जाणाऱ्या समितीच्या कामकाजाची तसेच राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची, व नियमांची माहिती दिली त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या तक्रारी असल्यास महाविद्यालयात तक्रारपेटी उपलब्ध आहे त्याचा वापर करा असे आव्हान देखील केले त्याचबरोबर महाविद्यालयात असणाऱ्या समुपदेशन केंद्राची माहिती देऊन त्या मार्फत केल्या जाणाऱ्या मोफत समूपदेशनाचा देखील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला पाहिजे व आपल्या समस्या सोडविण्यासाठी पहिले पाऊल उचलले पाहिजे असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला या कार्यक्रमाचे संयोजन अँटीहरेसमेंट विभागाच्या समन्वयक डॉ रूपाली शेंडकर व डॉ स्वाती शिंदे यांनी केले.

**प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे मार्गदर्शन करताना**



**20/12/2023 'शहरातील महिलांची सुरक्षितता':**

मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात दिनांक २० डिसेंबर 2023 रोजी दैनिक लोकमतचे पत्रकार श्री जितेंद्र गोळे यांचे शहरातील महिलांची सुरक्षितता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आली यामध्ये प्रवासात महिलांनी घ्यावयाची काळजी तसेच अडचणीच्या वेळी महिलांना पुरविली जाणारी प्रशासनाची मदत तसेच पोलिसांची दूरध्वनी यंत्रणा, मोबाईल व्हॅन इत्यादी विषयी मार्गदर्शन केले त्याचबरोबर दैनिक लोकमत या संस्थेने दिनांक 22 डिसेंबर 2023 रोजी सखी रात रागिणी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन वूमन सेल व अँटीहरेसमेंट समितीच्या समन्वयक डॉ रूपाली शेंडकर सहकारी प्राध्यापकांनी केले

**दैनिक लोकमतचे पत्रकार श्री जितेंद्र गोळे मार्गदर्शन करताना**



**22/12/2023 'सखी रात रागिणी' महिला सुरक्षितता रॅली:**

दिनांक 22 डिसेंबर 2023 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिक लोकमत आयोजित 'सखी रात रागिणी' या उपक्रमात महिलांच्या सुरक्षिततेविषयी जाणीव जागृती निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून मामासाहेब मोहोळ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी तसेच महिला प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अलका टॉकीज चौक ते शनिवार वाडा रात्री 11 ते 1 वाजेपर्यंत सुरक्षितता रॅलीमध्ये आपला सहभाग नोंदविला महाविद्यालयाच्या संपूर्ण रॅलीचे संयोजन वूमन सेल आणि अँटीहरेसमेंट सेल च्या समन्वयक डॉ. रूपाली शेंडकर व त्यांच्या समिती सदस्यांनी केले

विद्यार्थीनी, प्राध्यापिका आणि शिक्षकेतर महिला कर्मचारी सुरक्षितता रॅलीमध्ये सहभाग नोंदविला



**17/01/2024 'स्वसंरक्षणाच्या तंत्र - कराटे आणि कुडो मार्शल आर्ट प्रशिक्षण':**

दिनांक 17 जानेवारी 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियाना' अंतर्गत दोन दिवसाची कार्यशाळा भरविण्यात आली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ वूमन सेल अँटी रॅगिंग समिती आणि छळ प्रतिबंधक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे क्रीडा समन्वयक श्री श्याम भोसले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थिनींनी आपल्या शारीरिक आणि मानसिक क्षमतांचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून उत्तम आहार त्याचबरोबर व्यायामावरती भर दिला पाहिजे. समाजातील विकृती पाहता महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून स्वसंरक्षणासाठी विद्यार्थिनींनी विविध प्रकारच्या स्वसंरक्षणाच्या तंत्रांचे प्रशिक्षण घेऊन त्याचा नियमित सराव करणे गरजेचे आहे. त्यासाठी कराटे मार्शल आर्ट लाठी काठी प्रशिक्षण विद्यार्थिनींना देण्याचे आश्वासन दिले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात कराटे आणि मार्शल आर्ट चे प्रशिक्षक किशोर शिंदे व त्यांचे विद्यार्थी यांनी व संरक्षणासाठी कराटे आणि मार्शल आर्टचा वापर करून कोणत्याही शस्त्राशिवाय कमी ताकद लावून आपण स्वतःचे कसे संरक्षण करू शकतो याबाबत प्रात्यक्षिके देऊन विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले व त्यांच्याकडून सराव करून घेतला. किशोर शिंदे यांनी विद्यार्थिनींना आपल्या पालकांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी व त्यांची काळजी कमी करण्यासाठी नियमित आहार आणि व्यायामावरती नियमित लक्ष केंद्रित करण्याचे आव्हान केले.

या कार्यशाळेचे संयोजन डॉ.सपना राणे यांनी केले छळ प्रतिबंधक समितीच्या प्रमुख डॉ रूपाली शेंडकर यांनी कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले. कार्यशाळेला डॉ. मेघना भोसले, डॉ. सुनिता डाकले, डॉ.आदिनाथ पाठक, प्रा.तानाजी जाधव उपस्थित होते कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.अलका वाडेकर यांनी केले आणि आभार डॉ. स्वाती शिंदे यांनी मानले महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व समिती सदस्यांच्या सहकार्याने कार्यशाळा यशस्वी झाली.

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे क्रीडा समन्वयक श्री श्याम भोसले  मार्गदर्शन करताना**














प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी आणि मार्शल आर्ट आणि कराटेचे प्रशिक्षण घेताना विद्यार्थिनी














**17/01/2024 'स्त्री पुरुष समानता, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक शोषण':**

दिनांक 17 जानेवारी 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियाना' अंतर्गत दोन दिवसाची कार्यशाळा भरविण्यात आली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ वूमन सेल अँटी रॅगिंग समिती आणि छळ प्रतिबंधक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या तृतीय सत्रात ॲडव्होकेट प्रीती हरपळे यांचे स्त्री पुरुष समानता, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक शोषण या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ॲडव्होकेट प्रीती हरपळे यांनी समाजात घडणाऱ्या विविध प्रकारच्या घटनांची उदाहरणे देऊन विद्यार्थिनींना कौटुंबिक हिंसाचाराला बळी न पडता अशी प्रकरणे कायदेशीर मार्गाने कशी हाताळावी तसेच लैंगिक शोषण, हुंडाबळी, महिलांचा अपमान, आर्थिक शोषण याविषयीच्या कायद्यांची माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

घटस्फोटाचे वाढते प्रमाण ही दोवसेंदिवस वाढणारी प्रकरणे गंभीर स्वरूपात असून त्यासाठी विद्यार्थिनींनी सामोपचार, तडजोड, समुपदेशन यांच्या साह्याने कुटुंब व्यवस्था सुरक्षित ठेवण्यासाठी प्रथम प्रयत्न केले पाहिजेत. अन्याय अत्याचार होत असेल तर घटस्फोटा संबंधीचे कायदे मिळणारी पोटगी व महिला म्हणून मिळणारे काही हक्क याबाबत महिला अत्याचाराची प्रकरणे सांगून मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे संयोजन डॉ.सपना राणे यांनी केले छळ प्रतिबंधक समितीच्या प्रमुख डॉ रूपाली शेंडकर यांनी कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले. कार्यशाळेला डॉ. मेघना भोसले, डॉ. सुनिता डाकले, डॉ.आदिनाथ पाठक, डॉ. स्वाती शिंदे उपस्थित होते कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.अलका वाडेकर यांनी केले आणि आभार प्रा.तानाजी जाधव यांनी मानले महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व समिती सदस्यांच्या सहकार्याने कार्यशाळा यशस्वी झाली

**ॲडव्होकेट प्रीती हरपळे मार्गदर्शन करताना**













**18/01/2024 'लैंगिक संवेदना आणि लैंगिक समानता':**

दिनांक 18 जानेवारी 2024 रोजी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियाना' अंतर्गत दोन दिवसाची कार्यशाळा भरविण्यात आली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ वूमन सेल ॲंटी रॅगिंग समिती आणि छळ प्रतिबंधक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी 'लैंगिक संवेदना आणि लैंगिक समानता' या विषयावर **ॲडव्होकेट** जयश्री बोडेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात **ॲडव्होकेट** जयश्री बोडेकर यांनी विद्यार्थ्यांना स्त्री पुरुष समान हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या आणि संधी इत्यादी विषयी समाजातील विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. महिलांनी सर्व क्षेत्रात नेतृत्वाच्या भूमिकेतून सत्तेत येण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे त्या म्हणाल्या यामुळे विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढेल आणि इतर

महिलांना व पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळेल तसेच आपल्या मार्गदर्शनात त्यांनी राजस्थान मधील विशाखा प्रकरण आणि भवरी देवी प्रकरणाची माहिती विद्यार्थिनींना दिली.

या कार्यशाळेचे संयोजन डॉ.सपना राणे यांनी केले छळ प्रतिबंधक समितीच्या प्रमुख डॉ रूपाली शेंडकर यांनी कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले. कार्यशाळेला डॉ. मेघना भोसले, डॉ. सुनिता डाकले, डॉ.आदिनाथ पाठक, डॉ. स्वाती शिंदे, प्रा. तानाजी जाधव उपस्थित होते कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.अलका वाडेकर यांनी केले आणि आभार प्रा. रजनीगंधा इंगोले यांनी मानले महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व समिती सदस्यांच्या सहकार्याने कार्यशाळा यशस्वी झाली

**ॲडव्होकेट जयश्री बोडेकर मार्गदर्शन करताना**












डॉ. रूपाली शेंडकर
(समन्वयक)

प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी